सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/११४ दिनांक : २०/०७/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्ह्यांतील
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या जिल्हानिहाय वार्षिक नियोजन सभेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **पुणे जिल्ह्यांतील** सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधून नियुक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची वार्षिक नियोजन सभा **शुक्रवार, दिनांक २४ जुलै, २०२६ रोजी भू–शास्त्र विभाग सभागृह, (सेवक विहार समोर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय आयोजित करण्यात आली आहे.**

| दिनांक | विभाग/जिल्हा | नाव नोंदणी | सभा वेळ | महाविद्यालये | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| शुक्रवार, दिनांक २४ जुलै, २०२६ | पुणे जिल्हा (शहर व ग्रामीण) | सकाळी १०.३० ते सकाळी ११.०० | सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० | पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | **भू–शास्त्र विभाग सभागृह, (सेवक विहारा समोर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** |

**सदर सभेपुढील विषय :**

१. विद्यार्थी अपघात विमा योजना मार्गदर्शन.
२. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील विविध योजना व उपक्रमांचे मार्गदर्शन व वार्षिक नियोजन करणे.
३. विविध योजना व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज, अहवाल भरण्याबाबत आणि योजनेबाबत येत असणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करणे.
४. विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजनाबाबत.
५. आयत्या वेळचे विषय.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस वरीलप्रमाणे विहित दिनांकास व वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनीही आपला प्रतिनिधी परस्पर पाठवू नये याबाबतही आपण लक्ष घालावे. कळावे, ही विनंती.

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ